मॉल, दुकानांमध्ये वाइन विक्रीबाबत लवकरच धोरण

उत्पादन शुल्कमंत्री शंभुराज देसाई यांची माहिती

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : व्यापारी संकुल (मॉल), दुकानांमध्ये वाइन विक्रीबाबत राज्यातील नागरिकांकडून सूचना, हरकती मागविण्यात आल्या आहेत. त्यामध्ये ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांकडून आलेल्या सूचना, हरकती वेगवेगळ्या करण्यात येणार आहेत. त्यावर सचिवांकडून माहिती घेऊन तयार करण्यात आलेले धोरण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे मांडण्यात येणार आहेत. त्यानंतर निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती उत्पादन शुल्कमंत्री शंभुराज देसाई यांनी दिली.

पुणे उत्पादन शुल्क विभागाच्या आढावा बैठकीनंतर राज्य उत्पादन शुल्कमंत्री देसाई पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, ‘वाइन ही फळापासून तयार होते. मात्र, त्यासाठी आवश्यक असणारा कच्चा माल शेतकऱ्यांकडून आला, तर त्याचा लाभ शेतकऱ्यांनाच होणार आहे. याबरोबरच वाइन उत्पादन शेतकऱ्यांनी केल्यास त्याचा जास्त फायदा देखील शेतकऱ्यांनाच होणार आहे. जो निर्णय होईल तो शेतकऱ्यांच्या हिताचाच असेल.’

राज्यास महसूल देणारा उत्पादन शुल्क हा विभाग तिसऱ्या क्रमांकावर आहे. ही बाब लक्षात घेऊन पुणे विभागातून गेल्या वर्षीपेक्षा जास्त महसूल कसा मिळेल यावर भर देण्याच्या सूचना दिल्या आहेत. पुणे जिल्ह्यात गेल्या वर्षी इतर राज्यातून येणाऱ्या अवैध मद्यावर मोठ्या प्रमाणावर कारवाई केली. त्यातही चार मोठ्या कारवाई केल्या आहेत. उत्पादन शुल्क विभागात पोलिसांसारखी ‘खबऱ्या’ यंत्रणा राबविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याबरोबरच देशातील काही राज्यांनी परवाना नूतनीकरण करण्यामध्ये बदल केले आहेत. त्यामुळे उत्पादन शुल्कचे उत्पन्न वाढले आहे. हे उत्पादन कसे वाढले त्यासाठी संबंधित राज्यातील उत्पादन शुल्क विभागाने काय प्रयत्न केले, याचा अभ्यास करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यानुसार राज्यात महसूल वाढविण्यासाठी काय बदल करता येईल, यावर देखील भर देण्यात येणात आहे. उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांना वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत, असेही देसाई यांनी सांगितले.

तेव्हा तुम्ही मिंधे का झालात?

शंभुराज देसाई यांच्याकडून उद्धव ठाकरे लक्ष्य

पवारांनी ठाकरेंना वेळीच सल्ला दिला असता तर...

मुख्यमंत्री शिंदे राज्याचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी दिल्लीला जातात. महाविकास आघाडी सरकारचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे अडीच वर्षे घरात बसून होते. तेव्हा पवार यांनी त्यांना बाहेर पडा, नागरिकांच्या समस्या जाणून घ्या, मंत्रालयात जा असा सल्ला किंवा आदेश दिला असता, तर ही वेळ आली नसती, असा खोचक टोलाही देसाई यांनी शरद पवार यांना लगावला.

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : केवळ पदाच्या लोभापायी जो पक्ष गेली अडीच वर्षे काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाच्या दावणीला बांधला तेव्हा का मिंधे झालात, शिवसैनिकांचे नुकसान का केले? मुख्यमंत्री पद असताना गृह खात्याकडून शिवसैनिकांवर मोक्का लावला, तडीपारी केली, पश्चिम महाराष्ट्रातील शिवसेनेचे पदाधिकारी अद्याप जेलमध्ये आहेत, तरी तत्कालीन मुख्यमंत्री का मिंधे राहिले?, असे सवाल करत राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुणे विभागाच्या आढावा बैठकीपूर्वी राज्य उत्पादन शुल्क मंत्री देसाई पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, ‘राज्यातील मतदारांनी शिवसेना-भाजप युती सरकारलाच पाठिंबा दिला होता. हीच युती प्रत्यक्षात आणण्यासाठी आम्ही खरी शिवसेना घेऊन भाजपसोबत गेलो असून नागरिकांचा या सरकारला उत्स्फूर्त प्रतिसाद आहे. त्याचा प्रत्यय गेल्या काही दिवसांपासून येत आहे. पूर्वी दसरा मेळावा घेण्यासाठी आमदार, खासदार नेते, उपनेते स्थानिक पातळीवर नगरसेवकांसोबत बैठका घेत होते. पण आता दसरा मेळाव्यासाठी गर्दी जमविण्यासाठी थेट पक्षप्रमुखच गट प्रमुखांची बैठक घेत आहेत. हे शिवसेनेच्या इतिहासात प्रथमच घडत आहे. आमच्यामुळे शिवसेनेतील गट प्रमुखांचे वजन वाढले आहे.’

आम्हाला बाळासाहेब ठाकरे यांच्या कुटुंबातील व्यक्तींबाबत आदरच आहे. आम्ही टीका करत नाही, करणारही नाही. प्रत्युत्तर आमचे पक्षप्रमुख आणि विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे देतील. आम्ही आसमान दाखवायचे काम तीन महिन्यापूर्वी केले आहे. आगामी लोकसभा, विधानसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आमची ताकद नक्की दाखवू. शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आल्यानंतर झालेल्या नगरपालिका, नगरपरिषदांच्या निकालात जनतेचा कौल नैसर्गिक युती असणाऱ्या सरकाच्या बाजूने दिसून आला आहे, तर ठाकरे पाचव्या स्थानी गेले असून त्यांनी आत्मपरीक्षण करावे, असेही देसाई म्हणाले.

अडीच वर्षात ठाकरे सरकारकडून निष्क्रिय कारभार – गिरीश महाजन

अस्तित्व टिकवण्यासाठीच ठाकरेंची प्रक्षोभक भाषणे

लोकसत्ता प्रतिनिधी

पिंपरी : अडीच वर्षाच्या सत्ताकाळात आणि मुख्यमंत्री असतानाही उद्धव ठाकरे घराबाहेर पडले नाहीत. मंत्रालयाची पायरी त्यांनी कधी चढली नाही. मंत्री, आमदार व खासदारांना ते कधी भेटले नाहीत. यावरून त्यांची राज्यकारभाराविषयी उदासीनता दिसून येत होती, अशी टीका राज्याचे ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांनी चिंचवडला पत्रकार परिषदेत बोलताना केली. अस्तित्व टिकवण्यासाठी उद्धव ठाकरे भडक, प्रक्षोभक भाषणे करत असून ही त्यांची शेवटची धडपड असल्याचे आम्ही मानतो, असेही महाजन म्हणाले.

चिंचवड येथील कार्यशाळेसाठी महाजन आले होते, तेव्हा त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील उपस्थित होते.

महाजन म्हणाले, की उद्धव ठाकरे यांच्या कालच्या मुंबईतील भाषणावरून त्यांची अस्वस्थता लक्षात येते. ४० आमदार, १२ खासदार पक्ष सोडून गेले. उर्वरित शिवसेना त्यांच्या हातातून निसटत चालली आहे. राज्याबाहेरचे शिवसैनिकही एकनाथ शिंदे यांना जोडले गेले आहेत. ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये ते शेवटच्या स्थानावर आहेत. त्यामुळेच अस्तित्वासाठी प्रक्षोभक भाषणे करण्याचा त्यांचा केविलवाणा प्रयत्न सुरू आहे. आता त्यांनी काहीही बोलले तरी त्याचे उलटे परिणाम होतील. त्यामुळे त्यांनी संयम ठेवणे आणि आत्मपरीक्षण करणे हेच उचित ठरेल.

महाजन म्हणाले, की ५ जानेवारीला वेदांताने राज्यशासनाला पत्र दिले होते. त्यानंतरच्या सहा महिन्यात त्याविषयी एकही बैठक तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी बोलवली नाही. दारू, वाईनसाठी बैठका घेतल्या गेल्या. मात्र, वेदांताविषयी कोणतीही बैठक तथा कंपनीशी चर्चा झाली नाही. त्यामुळे याविषयी बोलण्याचा त्यांना अधिकारच नाही. सत्तांतर झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेदांता कंपनीप्रमुखांची भेट घेतली. मात्र, दोन महिन्यापूर्वीच आमचा निर्णय झाल्याचे आणि आम्हाला इथे प्रकल्प करायचा नाही, असे त्यांनी स्पष्ट केले होते. आघाडी सरकारच्या चुकांमुळे वेदांत प्रकल्प राज्याबाहेर गेला. यापुढील काळात राज्यात महत्त्वपूर्ण उद्योग प्रकल्प येतील. त्यादृष्टीने समर्थपणे प्रयत्न करणारे मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांचे खांदे सक्षम आहेत. केंद्र सरकारही पाठीशी आहे, असे महाजन म्हणाले.

निवडणुकीची रणनीती ठरविण्यासाठी सीतारामन यांची राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पदाधिकाऱ्यांबरोबर बैठक

बैठकीत भाजपच्या पदाधिकाऱ्यांना प्रवेश नाकारला

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गुरुवारी सकाळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी आणि विचार परिवार समन्वय बैठक घेतली. भारतीय जनता पक्षाची बारामती मोहीम यशस्वी करण्याच्यादृष्टीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पदाधिकाऱ्यांसमवेतची बैठक महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या बारामती लोकसभा मतदार संघात विजय मिळविण्यासाठी भारतीय जनता पक्षाने बारामती मोहीम हाती घेतली आहे. त्याअंतर्गत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन बारामतीच्या दौऱ्यावर आल्या आहेत. त्याची सुरुवात गुरुवारपासून शहरी भागातील संपर्काने झाली. धनकवडी येथील छत्रपती शिवराय मंगल कार्यालयात निर्मला सीतारामन यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीला शहरातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जाळे लक्षात घेऊन या बैठकीला महत्त्व देण्यात आले. या बैठकीत पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीच्या दृष्टीने काही सूचना केल्याचे सांगण्यात आले.

बैठकीत प्रवेश नाही

संघाच्या पदाधिकाऱ्यांव्यतिरिक्त अन्य कोणालाही बैठकीत प्रवेश देण्यात आला नाही. भाजपच्या पदाधिकाऱ्यांनाही प्रवेश नाकारण्यात आला. निवडणुकीच्या दृष्टीने या बैठकीत रणनीती ठरविण्यात आल्याचे सांगण्यात आले.

कास पठारावर ‘ई-बस’, ‘बायोटॉयलेट’ सुविधा सुरू

लोकसत्ता वार्ताहर

कराड : जागतिक नैसर्गिक वारसास्थळ असलेल्या कास पठारावरील पर्यटन प्रदूषणमुक्त अन् पर्यावरणपूरक व्हावे म्हणून ‘ई-बस’ व ‘बायोटॉयलेट’ सुविधांचे बुधवारी राज्याचे पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते मंत्रालयातून दूरचित्रप्रणालीद्वारे लोकार्पण झाले. राज्याचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, पर्यटन संचालक मिलिंद बोरीकर, आमदार शिवेंद्रराजे भोसले आदी उपस्थित होते.

मंगलप्रभात लोढा म्हणाले, की स्वित्झर्लंडपेक्षाही सुंदर असलेला कास पर्यटनाचा ठेवा जपण्यासाठी पर्यटन खाते प्रयत्नशील आहे. कास पठार नैसर्गिक रीत्या अधिक फुलावे यासाठी पर्यावरणपूरक उपाययोजना करण्यावर भर आहे. राज्य शासनाच्या नवीन महाबळेश्वरच्या योजनेतून कास पठारच्या विकासाला प्राधान्य राहणार आहे. वॉक वे तसेच दर्शन गच्ची (व्हिव्हिंग गॅलरी) सुरू करणे, स्थानिकांना रोजगार वाढविण्यासाठी आराखडा करणे, सुरक्षा वाढविणे तसेच घनकचरा व्यवस्थापन याबाबतही कार्यवाही होईल असे लोढा यांनी सांगितले.

या उपक्रमाला प्रोत्साहन दिल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार उदयनराजे भोसले, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार शिवेंद्रराजे भोसले यांचे आभार मानताना कास पठाराच्या संवर्धनासाठी तसेच या माध्यमातून स्थानिकांना रोजगार वाढविण्यासाठी सर्व जण मिळून प्रयत्न करू, असे आवाहनही मंत्री लोढा यांनी केले.

जिल्ह्यात १५६ जणांना नव्याने करोना संसर्ग

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : गुरुवारी दिवसभरात जिल्ह्यातील १५६ जणांना करोना संसर्गाचे निदान झाले. राज्याच्या साथरोग सर्वेक्षण विभागाने याबाबत माहिती दिली. मात्र, बहुसंख्य करोना रुग्णांना सौम्य लक्षणे असून ते घरच्या घरी बरे होत असल्याने घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

गुरुवारी दिवसभरात आढळलेल्या १५६ नवीन रुग्णांपैकी ९७ रुग्ण पुणे महापालिका क्षेत्रातील आहेत. ४२ रुग्ण पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात, तर १७ रुग्ण जिल्ह्याच्या उर्वरित भागात आढळले आहेत. संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी विशेषतः जोखीम गटातील रुग्ण, सहव्याधीग्रस्त आणि ज्येष्ठ नागरिकांनी तसेच लसीकरण न झालेल्या नागरिकांनी मुखपट्टी वापरासह सर्व आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. गुरुवारी आढळलेल्या १५६ नव्या रुग्णांमुळे पुणे जिल्ह्यातील एकूण करोना रुग्णसंख्या १५ लाख ५८८ एवढी झाली आहे. सध्या जिल्ह्यातील ११९४ रुग्णांवर करोनाचे उपचार सुरू आहेत.

‘वेदान्त’बाबत सीतारामन यांची सोयीस्कर बगल

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यात तीन ते चार महिन्यांपूर्वी सत्तेत होते, ते वेदांत फॉक्सकॉन प्रकल्पाबाबत टीका करत आहेत. बुलेट ट्रेन, रिफायनरी, नाणार प्रकल्प हे सगळं थांबविणारी लोक आता बोलत आहेत. हे सगळे हजारो कोटींचे प्रकल्प राज्याच्या हिताचेच होते. मुंबईमधील आरे कारशेडला विरोध करणारे कोण आहेत? अशा शब्दात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी वेदांत फॉक्सकॉन प्रकल्पाच्या स्थलांतरावरून विरोधकांना सुनावले. तीन वर्षांपूर्वीपर्यंत सत्तेत असलेल्यांनी विरोध केलेल्या प्रकल्पांचा गुजरातला कोणता फायदा होणार होता? अशी विचारणाही त्यांनी केली.

विविध सरकारी योजनांमधील लाभार्थ्यांशी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गुरुवारी भोरजवळील वरवे या गावी संवाद साधला. त्यानंतर पत्रकारांशी त्या बोलत होत्या.

पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथील वेदांत फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला स्थलांतरित झाला आहे. केंद्र सरकारच्या दबावामुळेच हा प्रकल्प गुजरात केल्याचा आरोप भाजप विरोधकांकडून होत आहे. यासंदर्भात निर्मला सीतारामन यांना विचारले असता त्यांनी या प्रश्नाला सोईस्कर बगल देत विरोधकांवर पलटवार केला.

राज्याच्या हिताचे हजारो कोटींचे प्रकल्पांना तेव्हा सत्तेत असलेल्यांनी विरोध केला. बुलेट ट्रेन, पालघर येथील प्रकल्प, पोर्ट, नाणार रिफायनरी यांसारख्या पाच महाराष्ट्राच्या हितासाठी आवश्यक असलेल्या प्रकल्पांना कोणी विरोध केला? वेदांत प्रकल्पावरून विरोधक केवळ राजकारण करत आहेत. मुंबई येथील आरे कारशेडला कोणाचा विरोध आहे. त्यातून कोणाचे नुकसान झाले आणि गुजरातला काय फायदा झाला, हे आधी पाहावे, असे सीतारामन यांनी सांगितले.

भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला की सक्त वसुली संचलनालयाची (ईडी) चौकशी लागत नाही. भाजपकडे वॉशिंग मशिन आहे, अशी टीका बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली होते. त्यालाही सीतारामन यांनी उत्तर दिले. बारामती लोकसभा मतदारसंघातील दौरा आणि ईडीचा काही संबंध नाही. ईडीच्या कारवाईमध्ये लुडबूड करण्याचा प्रश्नच येत नाही. आर्थिक गैरव्यवहार झाला असेल किंवा तसा संशय असल्यास तर ईडीकडून कारवाई केली जाते, असे त्यांनी सांगितले.

महागाईबाबत लोकसभेत प्रत्येक वेळी स्पष्टीकरण देण्यात आले आहे. अमेरिका, जर्मनी, तुर्कीमध्येही महागाई आहे. भारताची परिस्थिती बदलण्यासाठी विविध स्तरावर उपाययोजना सुरू आहेत, असेही सीतारामन यांनी महागाईसंदर्भातील प्रश्नाला उत्तर दिले.

MANAPPURAM HOME FINANCE LTD.
मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड
पूर्वीची ‘मनप्पुरम होम फायनान्स प्रा. लि.’
सीआयएन : यू६५९२३केएल२०१०पीएलसी०३९१७९
युनिट नं. ३०१ व ३१५, तिसरा मजला, "ए" विंग, "कनाकिया वॉल स्ट्रिट", अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पू), मुंबई-४०००९३.
संपर्क क्र. : ०२२-६८१९४००० / ०२२-६६२११०००.

मागणी सूचना

याद्वारा सूचना देण्यात येते की खालील ऋणकोंनी कंपनीकडून त्यांच्या द्वारा प्राप्त केलेल्या कर्ज सुविधेची मुद्दल व व्याज रकमेची परतफेड करण्यास कसूर दाखविली आहे आणि कर्जाचे नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स (एनपीए) म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. वित्तिय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचनेच्या कलम १३ (२) आणि सुरक्षा हित कायदा, २००२ची अंमलबजावणी अंतर्गत याखाली तपशीलवारपणे दिल्यानुसार उक्त ऋणकोंच्या माहितीप्रित्यर्थ या अतिरिक्त त्यांच्या द्वारा कंपनीकडे तरतूद केल्यानुसार त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर या जाहीर सूचनेद्वारा त्यांच्याकरिता निर्गमित केलेल्या दिनांकित सूचनेद्वारा कळविण्यात येत आहे.

अ. क्र.	ऋणको/ सह-ऋणकोचे नाव/ लोन अकाउंट नंबर/ शाखा	सुरक्षित मत्तेचे वर्णन ज्याकरिता स्वारस्य दाखविण्यात आले आहे	एनपीए तारीख	सूचना पाठविल्याची तारीख व थकित रक्कम
1.	श्रीराम श्यामसुंदर शर्मा, संगिता श्यामसुंदर शर्मा, कनाराम मदाराम आजाना/ पीयू१०पीयूएलओएनएस०००००५००६३११/ पुणे स्वारगेट	फ्लॅट नं. ०२, दुसरा मजला, पटेल निवास, सर्व्हे नं. १५/७/३, दास ॲग्रो कंपनी जवळ, कोल्हेवाडी, पुणे, पी.ओ. खडकवासला, पुणे पीन : ४११०२४, महाराष्ट्र.	०८-०९-२०२२	०८-०९-२०२२ व रु. १६३९७१६/-
2.	इस्लामसोरिफुल लिफाज मोइल, निलूफायेसमीन अमजद होसाइन्सक, बजरंग चंद्रकांत मोलक/ पीयू१०पीयूएलओएनएस०००००५०११०३१/ पुणे – पूल गेट	फ्लॅट नं. ४०३, ४था मजला, जय गणेश हाईट्स, सर्व्हे नं. ५७, हिस्सा नं. ८/११, लेन नं. २३, शिवनेरी नगर, कोंढवा खुर्द, पी.ओ. एन.आय.बी.एम., पुणे पीन : ४११०४८, महाराष्ट्र.	२५-०८-२०२२	०८-०९-२०२२ व रु. ४६५४६१/-

वरील ऋणकोंना सल्ला देण्यात येतो की त्यांनी कलम १३ (२) अंतर्गत सूचनेच्या निर्गमनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या कालावधीच्या आत अदत्त रकमेचे प्रदान करावे, त्यास असमर्थ ठरल्यास वित्तिय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचनेच्या तरतुदींच्या अनुसार वर नमूद केलेल्या दिनांकित कलम १३ (२) आणि सुरक्षा हित कायदा, २००२ची अंमलबजावणी अंतर्गत सूचनेच्या निर्गमनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या समाप्तीनंतर पुढील पावले उचलण्यात येतील.

स्वाक्षरी/-
तारीख : २३-सप्टें-२०२२
स्थळ : पुणे
प्राधिकृत अधिकारी
मणप्पुरम होम फायनान्स लि.

OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.
ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
सीआयएनः यू६७१००टीझेड२०१४पीटीसी०२०३६३
नोंदणीकृत कार्यालयः ९, एम.पी.नगर, फर्स्ट स्ट्रिट, कोंगू नगर एक्सटेन्शन, तिरुपूर-६४१६०७.
कॉर्पोरेट कार्यालयः सी/५१५, कनाकिया झिल्लीओन, एलबीएस रोड व सीएसटी रोडचे जंक्शन, बीकेसी ॲनेक्स, इक्विनॉक्स जवळ, कुर्ला (प), मुंबई-४०००७०. ईमेलः **mumbai@omkaraarc.com** मोबा : +९१ ७५५८३९२७३६

[परिशिष्ट - IV-ए] [तरतुदी ९(१) यासह वाचलेल्या नियम ८ (६) च्या तरतुदी पाहा]

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलावासंबंधित जाहीर सूचना

सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ (६) व नियम ९ (१) च्या तरतुदीसह वाचलेल्या वित्तिय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हित कायदा, २००२ ("सर्फेसी कायदा") च्या अंमलबजावणी अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रिकरिता ई-लिलाव विक्रि सूचना

आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको व हमीदारांना याद्वारा सूचना देण्यात येते की याखाली वर्णिलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनकोकडे गहाणवट आहे / ताब्यात आहे. सदर स्थावर मालमत्तेचा ताबा "एडेलवीस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला आहे. **याअधिक, ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.ने ("ओएआरपीएल") (ओमकारा पीएस ३३/२०२०-२१ ट्रस्टचे विश्वस्थ म्हणून असलेल्या तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली) अभिहस्तांकर्त्याकडील खाली नमूद केलेल्या सुरक्षेसह संपूर्ण "एडेलवीस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"कडून ("अभिहस्तांकनकर्ता") दिनांकित ३०.०३.२०२१ अभिहस्तांकन करारनाम्याद्वारा खालील खात्यातील संपूर्ण थकित देणी प्राप्त केली आहेत. तदनुसार, "ओएआरपीएल"ने अभिहस्तांकर्त्या म्हणून कार्यभार हाती घेतला आहे आणि सुरक्षेवर ताबा आणि देणींच्या वसूलीकरिता अधिकार प्राप्त केले आहेत. प्राधिकृत अधिकारींनी नमूद केलेल्या सुरक्षेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे आणि त्यानंतर "ओएआरपीएल"च्या प्राधिकृत अधिकारींनी १३.०७.२०२१ रोजी प्रमाणे अभिहस्तांकर्त्याकडून याखाली नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा सोपविला आहे. "ओएआरपीएल"च्या प्राधिकृत अधिकारी याद्वारा देणींच्या वसूलीकरिता**
याखाली नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेची विक्रि करू इच्छित आहेत आणि म्हणून सुरक्षित मालमत्तेच्या खरेदीकरिता मोहोरबंद लिफाफ्यात निविदा / बोली मागविण्यात आल्या आहेत. सदर मालमत्तेची विक्रि खालील संबंधित ऋणको व सह-ऋणकोंकडील सुरक्षित धनको म्हणून "ओएआरपीएल"करिता संबंधित रकाना देणीत दर्शविल्यानुसार रकमेच्या वसूलीकरिता "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे", "जे काही आहे तेथे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" सर्फेसी कायद्याच्या कलम १३(२) व (४) च्या तरतुदीअंतर्गत हक्क व अधिकारांच्या अमंलबजावणीत करण्यात येणार आहे.
ऋणको / हमीदार / गहाणकार, प्रतिभूती, थकित देणी, कलम १३(२) अंतर्गत पाठविलेल्या मागणी सूचनेची तारीख, ताब्याची तारीख, राखीव किंमत, बोली वृद्धी रक्कम, इसारा रक्कम ठेव (इरठे), पाहाणीची तारीख व वेळ, इ. तपशील याखाली देण्यात आला आहे :

ऋणको/हमीदार / गहाणकाराचे नाव	सुरक्षित मत्तेचा तपशील	मालमत्तेचे मालक	मागणी सूचनेची तारीख व रक्कम तारीखः	राखीव किंमत	बोली वृद्धी रक्कम		पाहाणीची तारीख व वेळ
१. महेश जयप्रकाश जाजू (ऋणको) २. जयप्रकाश रतनलाल जाजू (सह-ऋणको)	पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- फ्लॅट धारण केलेला नं. ३, मोजमापाचा ३५६ चौ.फू. म्हणजेच ३३.०७ चौ.मी. (बिल्ट-अप एरिआ), "तिरुपती एन्क्लेव्ह" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीतील पहिल्या मजल्यावरील, जमीन धारण केलेला प्लॉट नं. १९, सर्व्हे नं. ५५/१+६७/१बी२/१ व २ यावर बांधकाम केलेला व येथे स्थित - धनोरी, ता. हवेली, जि. पुणे-४११०१५ आणि सदर मालमत्ता पुढीलप्रमाणे सिमितः **उत्तरः** लॉबी, **दक्षिणः** ओपन स्पेस, **पूर्वः** लगतचा फ्लॅट नं. ०२, **पश्चिमः** लगतचा फ्लॅट नं. ०४. **गुगल लोकेशन : १८’३५’२९.७"एन ७३’५३’२६.८"ई**	महेश जयप्रकाश जाजू	**१५.०६.२०१७ रु. १४,१७,५१३/-** (रुपये चौदा लाख सतरा हजार पाचशे तेरा फक्त)	रु. १३,५०,०००/-	रु. ५०,०००/-	रु. १,३५,०००/-	तारीखः ०३.१०.२०२२ वेळः दु. १२.०० वा. ते दु. ०१.००

अकाउंट नं.: ३४४९०५००१०१५, **लाभाधिकारीचे नावः** ओमकारा पीएस ३३/२०२०-२१ ट्रस्ट, **बँकेचे नावः** आयसीआयसीआय बँक, **शाखाः** बीकेसी मुंबई. **आयएफएससी कोडः** आयसीआयसी०००३४४९.
ई-लिलावाची तारीख व वेळ : १२.१०.२०२२ रोजी स. ११:०० ते दु १२:००
सहभागाच्या बोली पत्राचे सादरीकरण / केवायसी कागदपत्रे / इरठेचा पुरावा याकरिता शेवटची तारीख व वेळः ११.१०.२०२२ रोजी सायं ०६.०० वा.

लिलावाच्या शर्ती व अटी :
विक्रिच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया http://omkaraarc.com/auction.php यामध्ये तरतूद केलेली लिंक पाहा
सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ९(१) यासह वाचलेल्या नियम ८(६) अंतर्गत विक्रिकरिता सांविधिक सूचना
ही सूचना विक्रि बंद होण्यापूर्वी कोणत्याही वेळेत पुढील व्याज व सर्व किंमत, आकार आणि खर्च यासह एकत्रित वर नमूद केल्यानुसार थकित देणींचे प्रदान करून, जर ते इच्छूक असल्यास, मत्तेच्या विमोचनाकरिता सल्यासह वर संदर्भित तारीख व वेळेत ई-लिलावाद्वारा विक्रि / लिलावाचे आयोजन करून त्यांना कळविणारी, वित्तिय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हित कायदा, २००२ची अंमलबजावणीच्या तरतूदी आणि सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ९(१) यासह वाचलेल्या नियम ८(६) अंतर्गत वरील कर्ज खात्याच्या ऋणकोंकरिता १५ दिवसीय अनिवार्य सूचनासुद्धा आहे. प्रदानास कसूर झाल्यास, सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८ (५) अंतर्गत विहित असल्यानुसार कोणत्याही प्रकारे मालमत्तेची विक्रि करण्यास प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनकोच्या स्वेच्छाधिकारावर असेल.

स्वाक्षरी/-
तारीख : २३.०९.२०२२ स्थळ : मुंबई
प्राधिकृत अधिकारी,
ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लि.
(ओमकारा ३३/२०२०-२१ ट्रस्टचे विश्वस्थ म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली)

PUBLIC - NOTICE

Know all men by this notice that the property described in the schedule written hereunder is presently owned and possessed by Mrs. Kawaljeet Kaur Bagga and Mr. Satbir Singh Bagga. My client is negotiating to purchase and acquire all the right, title and interest in respect of the said Property. The owners have represented and assured my client that the Owners have full and absolute right to sell & convey the said Property to my client and have further represented and assured my client that, the said Property is free from any encumbrances and their title to the said Property is Legal, Clear and Marketable. This notice is issued for verification of the owner's title to the said Property.

Any person having any interest, claim, lien, mortgage, attachment, charge, maintenance right, easementary right or any other right, title, etc. whatsoever, in the said Property or any part thereof are hereby required to inform the undersigned, in writing, along with true documentary evidence, within 10 days from publication of this public notice or else my client shall presume, that no person has any interest in the said Property. Any right there after even if claimed, shall be deemed to be knowingly waived and abandoned. Thereafter my client shall proceed further for finalisation of transaction by way of negotiations and thereafter no claim of any person shall be entertained.

SCHEDULE OF PROPERTY

All that piece and parcel of Flat No. 204 admeasuring area 106.83 Sq. Mtrs. Built-Up, and Flat No. 204 A admeasuring area 97.94 Sq. Mtrs. Built-Up, situated on 2nd Floor, and with One Car Parking No. 9 and 9A at ground floor in the building known as "Lotus", in Society known as "Flower Valley Co-operative Housing Society Ltd", constructed on the land bearing City Survey No. 1438, Survey No. 73 (part), at revenue Village Wanwadi, Taluka Haveli, District Pune, within the local limits of Pune Municipal Corporation and also within the revenue jurisdiction of the Sub-Registrar Haveli, Pune.
Together with all the rights, title and/or interest attached thereto.

Adv. ABHIJIT BHARAT BOROLE
Off. No 3, Yojana Complex, Ramanbaug
Chowk, 502 Narayan Peth, Pune 411 030.
Mob: 8007799699

homefirst
We'll take you home
होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड
CIN: U65990MH2010PTC240703
वेबसाईट: homefirstindia.com फोन क्र.: 180030008425 ईमेल आयडी: loanfirst@homefirstindia.com

परिशिष्ट- IV-A [नियम 8(6) मधील तरतूद पाहावी]
अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) मधील तरतुदींसह वाचण्यात येणारया सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
याद्वारे स्तंभ () मधील कर्जदार व सह-कर्जदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/भारग्रस्त असलेल्या स्तंभ () मध्ये वर्णन करण्यात आलेल्या अचल मालमत्तांचा होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारयांनी खाली नमूद थकबाकी अधिक व्याजाच्या वसुलीसाठी प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे आणि ज्याअर्थी, थकबाकीची वसुली करण्यात असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकारांचा सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत सदर मालमत्तांची विक्री करून थकबाकीची वसुली करण्याचा विचार असून या मत्तांची खाली नमूद केल्यानुसार ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर विक्री करण्यात येईल. होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड यांना स्तंभ () नुसार कर्जदार व सह-कर्जदार यांचेकडून घेणे असलेल्या थकबाकी रकमेच्या वसुलीसाठी ''ऑनलाईन'' लिलाव राबविण्यात येईल.

अ. क्र.	कर्जदार व सह-कर्जदाराचे नाव	मालमत्तेचा पत्ता	मागणी सूचनेचा दिनांक	मागणी सूचनेतील रक्कम	ताबा दिनांक	बाजार मूल्य	बयाणा रक्कम	लिलावाचा दिनांक व वेळ	बयाणा रक्कम आणि दस्तावेज सादर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ	प्राधिकृत अधिकाऱ्याचा क्रमांक
	भाऊराव धर्मा दळवी, जयश्री भाऊराव दळवी	दुकान 1 आणि 2, माऊली पार्क बी विंग, मिळकत क्र. 78/6, आळंदी देवाची, आळंदी-वडगाव रोड, पुणे, महाराष्ट्र 412105	05-04-2021	11,21,534	11-06-2021	14,40,000	1,44,000	10-10-2022 (स. 11 - दु. 2)	08-10-2022 (सायं. 5 वाजेपर्यंत)	9529063454

ई-लिलाव सेवा पुरवठादार	तपशील, इतर अटी व शर्तींसाठी ई-लिलाव वेबसाईट	बयाणा रक्कम / इतर रक्कम जमा करण्यासाठी खाते क्र.	शाखेचा आयएफएससी कोड	लाभार्थ्यांचे नाव
कंपनीचे नावः ई-प्रोक्युरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड (ऑक्शनटायगर). हेल्प लाईन क्र.: 079-35022160 / 149/ 182 संपर्क व्यक्तीः राम शर्मा इ 8000023297 ई-मेल आयडीः **ramprasad@auctiontiger.net** आणि **support@auctiontiger.net**	http://www.homefirstindia.com https://homefirst.auctiontiger.net	912020036268117 - होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड, ॲक्सिस बँक लि., एमआयडीसी, अंधेरी पूर्व.	UTIB0000395	प्राधिकृत अधिकारी, होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड

बोली वृद्धी रक्कमः रु. 10,000/-. सदर विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे **(https://homefirst.auctiontiger.net)** या वेब पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून घेण्यात येईल. पोर्टल साईटवर ऑनलाईन ई-लिलाव बोली प्रपत्र, जाहीरनामा, ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सामान्य अटी व शर्ती असलेले ई-लिलाव निविदा दस्तावेज उपलब्ध आहे. प्राधिकृत अधिकारयांच्या माहितीप्रमाणे मालमत्तांवर कोणतेही बोजे नाहीत. परंतु, इच्छुक बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी लिलावात काढलेल्या मालमत्तेवरील बोजे, मालकी हक्क इ.बाबत तसेच मालमत्तेवर परिणाम करू शकणारया दावे/अधिकार/थकबाकी इ. बाबत स्वतंत्रपणे चौकशी करावी. सदर ई-लिलाव जाहिरात ही होम फर्स्टचे प्रतिनिधित्व किंवा वचन नसून ते तसे समजण्यात येऊ नये. सदर मालमत्तेची विक्री ही होम फर्स्ट यांना ज्ञात व अज्ञात अशा सद्य व भावी बोज्यांसह करण्यात येत आहे. तिसऱ्या पक्षाकडून करण्यात येणाऱ्या दावे/अधिकार/थकबाकी इ. साठी प्राधिकृत अधिकारी/प्रतिभूत धनको जबाबदार असणार नाहीत. सदर विक्री ही सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002अंतर्गत विहित नियम/अटींच्या अधीन राहून करण्यात येईल.

सर्फेसी अधिनियम, 2002 अंतर्गत 15 दिवसांची वैधानिक विक्री सूचना
कर्जदार/जामीनदारांना याद्वारे सूचित करण्यात येते की त्यांनी सदर मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेल्या रकमेचा ई-लिलावाच्या दिनांकापूर्वी अद्ययावत व्याज आणि इतर शुल्कांसह भरणा करावा, अन्यथा सदर मालमत्तेची विक्री करण्यात येईल आणि काही थकबाकी शिल्लक राहिल्यास ती व्याज व शुल्कासह वसूल करण्यात येईल.

दिनांक: 23-09-2022
स्थान: पुणे
स्वा/- प्राधिकृत अधिकारी
होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड